SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

(असाधारण)

मंगळवार, दिनांक १६ जुलै, २०२४

अधिसूचना

क्रमांक : ७८/२०२४ दिनांक : १६/०७/२०२४

विषय : सी.जी.एस. व सत्र पद्धती (विज्ञान गट) प्रणालीतील प्रथम व द्वितीय वर्ष उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सी. बी.सी.एस. प्रणालीत तृतीय वर्ष पाचव्या सत्रात सामावून घेण्याबाबत.

शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ पासून पदवी स्तरावरील शिखर संस्थांद्वारा संचालित अभ्यासक्रम जसे, फार्मसी, लॉ, एज्युकेशन, फिजीकल एज्युकेशन, एम.बी.ए. इंजिनिअरिंग या व्यतिरिक्त ईतर सर्व अभ्यासक्रमांस सी.बी.सी.एस. प्रणाली लागू करण्यांत आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ हे या प्रणालीचे तृतीय वर्ष आहे.

या अनुषंगाने सर्व सामान्यांच्या माहितीकरिता अधिसूचित करण्यांत येते की, शैक्षणिक सत्र २०२१-२०२२ व त्यापूर्वीच्या विविध विद्याशाखांमधील स्नातक स्तरावरील सी.जी.एस. व सत्र पद्धती (विज्ञान गट) प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष परीक्षा उत्तीर्ण होऊन त्यानांतर तृतीय वर्षाला २०२२-२०२३ व २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षामध्ये काही तांत्रिक कारणांमुळे प्रवेश न घेतलेल्या (खंड पडलेल्या) विद्यार्थ्यांना सी.बी.सी.एस पद्धतीमध्ये २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात तृतीय वर्ष – पाचव्या सत्रामध्ये प्रवेश देण्याचा निर्णय विद्यापीठ प्राधाकारिणीने घेतला आहे.

परंतु, अशा पद्धतीमधील प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सी.बी.सी.एस. पद्धतीमधील सत्र १, २, ३, व ४ ला अतिरिक्त असलेले विषय / बाबी जसेः जेनेरिक ओपन ईलेक्टीव्ह कोर्स, ॲबिलीटी एन्हांसमेंट कोर्स (महाविद्यालयीन स्तरावरील) इत्यादी बाबी सी.बी.सी.एस. पद्धतीकरिता वेळोवेळी निर्गमित निदेशांप्रमाणे पाचव्या व सहाव्या सत्रादरम्यान उत्तीर्ण / पूर्ण करणे अनिवार्य राहील. त्याशिवाय त्यांचा सहाव्या सत्राचा निकाल जाहीर करण्यात येणार नाही.

स्वा/-
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ